जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट क्रमांक :- २२२ दिनांक :- २१/०८/२०२१

# घरफोडी करणा-या ४ सराईत गुन्हेगारांना अटक करुन घरफोडीचे एकुण ८ गुन्हे उघडकिस.

दिनांक २०/६/२०२१ रोजी २२.३० ते दि.२१/६/२०२१ रोजी ०५.३० वा. चे दरम्यान फिर्यादी यांचे मेडीकल शॉप बंद केले असतांना ते कोणीतरी अज्ञात चोरटयाने कोणत्यातरी हत्याराने उचकटून मेडीकलमध्ये जाऊन काऊंटरचे ड्राव्हरमधील ३०,०००/-रुपये रोख्र रक्कम फिर्यादीचे संमतीशिवाय चोरी करुन नेले बाबत श्री. तरुणकुमार रुपदास वैष्णव, रा. श्री चंद्रलोक अपार्टमेंट, साई मंदिराजवळ, एस.व्ही.रोड भाईंदर पूर्व यांनी दिलेल्या तक्रारीवरुन नवघर पोलीस ठाणे येथे गुरनं. I ४३८/२०२१ भादंविसं. कलम-४५४, ४५७, ३८०, ३४ प्रमाणे गुन्हा करण्यात आला होता. सदरचा गुन्हा दाखल झालेनंतर सदर गुन्हयाचे व नवघर पोलीस ठाणे हद्दीत घडलेल्या इतर गुन्हयांचे गांभीर्य लक्षात घेऊन मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली विशेष पोलीस पथक तयार करुन सदर गुन्हयाचे घटनास्थळ, आजुबाजूचा परिसर, नजीकचे मुख्य रस्ते, गल्ली या भागातून माहिती प्राप्त करुन तसेच बातमीदार यांचेकडून माहिती मिळवून एकूण ०४ आरोपी निष्पन्न करुन अटक करण्यात आली व त्यांचेकडून ६,९७५/-रुपये रोख रक्कम व एक लोखंडी रॉड हस्तगत करणेत आला आहे.

नमुद गुन्हयांतील अटक आरोपींना वर नमुद गुन्हयांत अटक करुन त्यांचे पोलीस कस्टडी रिमांड दरम्यान त्यांचेकडे कौशल्यपूर्ण तपास केला असता त्यातील दोन आरोपी नामे सुरज मिश्रा व संदीप मुन्सी या आरोपीतांनी खालीलप्रमाणे गुन्हे केले असल्याचे उघडकीस आले आहे.

| अ.क्र. | पो.ठाणे | गुन्हा रजि. नंबर | कायदयाचे कलम |
|---|---|---|---|
| १) | नवघर पो.ठाणे . | I २५/२०२१ | भादंविसं.कलम-४५७,३८०,३४ |
| २) | नवघर पो.ठाणे | I ३५/२०२१ | भादंविसं.कलम-४५७,३८०,३४ |
| ३) | नवघर पो.ठाणे . | I ५६१/२०२१ | भादंविसं.कलम-४५७,३८०,३४ |
| ४) | नवघर पो.ठाणे | I ५६३/२०२१ | भादंविसं.कलम-४५७,३८०,३४ |
| ५) | नवघर पो.ठाणे | I १७९/२०२० | भादंविसं.कलम-४५७,३८० |
| ६) | नयानगर पो.ठाणे | I ४४१/२०२१ | भादंविसं.कलम-४५७,३८०,३४ |
| ७) | नयानगर पो.ठाणे | I ४४३/२०२१ | भादंविसं.कलम-४५७,३८०,३४ |

सदरची कामगिरी श्री. अमीत काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, डॉ. शशीकांत भोसले, सहा.पो.आयुक्त, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे सपोनि. योगेश काळे, पोउपनि. संदिप ओहोळ, पोना. रविंद्र भालेराव, पोना. ऐन्नुद्दीन शेख, पोशि. नवनाथ माने, पोशि. युनुस गिरगांवकर, पोशि.संदीप जाधव, पोशि.पाटील सर्व नवघर पोलीस ठाणे यांनी केली आहे.

-------------ooooo-------------